परिपत्रक क्र.७४

झोपुप्रा/सदनिका/अनिधिकृत हस्तांतरण/१२५५/०६

दिनांक : 18 FEB 2006

## परिपत्रक

विषय : महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या "कलम ३ ई" तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३ (१०) परिशिष्ट-४ मधील "उपनियम १.१८" अन्वये उपजिल्हाधिकारी,झोपुप्रा यांना अधिकार प्रदान करणे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या "कलम ३ ई" तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील "नियम ३३ (१०)" परिशिष्ट-४ मधील "उपनियम १.१८" नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत बांधलेल्या सदनिका दहा वर्षांच्या कालावधीकरीता विक्री,हस्तांतरण,भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणास मनाई आहे. फक्त झोपडपट्टीवासियांच्या वारसास हस्तांतराची तरतूद उपरोक्त "उपनियम १.१८" मध्ये आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील प्रशासकिय कामाचे स्वरूप विचारात घेता व कार्यालयीन काम सुरळीत व्हावे यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या "कलम ३ ई" तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील "नियम ३३ (१०)" परिशिष्ट-४ मधील "उपनियम १.१८" नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत बांधलेल्या सदनिका दहा वर्षाच्या कालावधीकरीता विक्री,हस्तांतरण, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणास फक्त झोपडपट्टीवासियांच्या वारसास हस्तांतरण वगळता मनाई करण्याचे "मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपुप्रा" यांना देण्यात आलेले अधिकार आता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या "कलम ३ एस" च्या तरतूदीप्रमाणे "उपजिल्हाधिकारी,झोपुप्रा" यांना प्रदान करण्यात येत आहेत.

मु. का. अ. यांचे कार्यालय
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
अनुक्रमांक : 123.
दिनांक : 18/2/2006

(सही)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण